# मूव्हिंग डायरी (जुलै २०१७)

गौतम पंगू

नुकतंच आम्ही पेनसिल्व्हेनियामधून शेजारच्या न्यू जर्सी राज्यात साधारण तासाभराच्याच अंतरावर मूव्ह झालो. नोकरीच्या जागांपासूनचं आम्हा दोघांचं अंतर वगैरे गोष्टींचा विचार करून केलेला हा बदल. 'कम्यूट' हा तसाही आम्हा नोकरी करणाऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय असतो. आपला कम्यूट किती वाईट आहे यावर लोक इतक्या उत्साहानं बोलत असतात की 'आता हा म्यूट होईल तर बरं' असं वाटू लागतं. तर ही मूव्ह करताना गंमत म्हणून अमेरिकेत आल्यापासून किती झिप कोड्समध्ये राहिलो हे मोजलं होतं. पण मग लक्षात आलं की बरेचदा एका झिपकोडमध्येही घरं बदललेली आहेत. शांतपणे बसून मोजणी केली तेव्हा मागच्या १५ वर्षांत राहिलेल्या घरांचा आकडा तब्बल १२ निघाला- म्हणजे सरासरी सव्वा वर्षाला एक घर! यातलं प्रत्येक घर बदलताना काही गोष्टी मात्र कायम होत्या. त्यातली एक म्हणजे घरागणिक वाढत  जाणारा सामानाचा आकार! ('आणि शरीराचासुद्धा' असं कोण म्हणालं रे ते?) स्टुडन्ट असताना फक्त काही सुटकेसेसमध्ये मावणाऱ्या सामानाला आता एक अख्खा ट्रक लागायला लागला! एवढं सामान जवळ कसं आणि कधी जमा होतं?

*****************************************************

या वेळचं शिफ्टिंग स्वतःच्या घरातून भाड्याच्या (हे घराचं विशेषण आहे, कुणालाही उद्देशून वापरलेलं संबोधन नव्हे!) घरात होतं, त्यामुळं मूव्हिंगच्या आधीच बरंचसं नको असलेलं सामान कमी करण्याचा प्रयत्न केला. जुन्या जुन्या गोष्टी फेकून देताना मी उगाचच आर्टिस्टिक असल्याचा आव आणत ' हा एकदम कॅथार्टिक अनुभव आहे, किती लिबरेटिंग फील येतोय, परगेशन झाल्यासारखं वाटतंय' असे उद्गार सारखे काढत होतो. पण हे ऐकून बायकोला वेगळाच संशय आला आणि तिनं मला 'जे काय लिबरेशन, परगेशन करायचं ते आधी तिकडं कर' म्हणून बाथरूमची वाट दाखवली. घरी पॉटी ट्रेनिंग सुरु असलेलं लहान मूल असलं की हे असं होतं, दुसरं काय!

********************************************************

मूव्हिंग ४ जुलैची सुट्टी साधून केलं. तेव्हा हवा बऱ्यापैकी गरम होती. पारा ९० फॅरनहाईट पर्यंत पोचला होता. आम्ही इकडं घाम गाळत न्यू जर्सीमध्ये प्रवेश करत होतो, पण तेव्हा न्यू जर्सी गव्हर्मेंटनं  मात्र त्याची अजिबात दखल घेतली नव्हती. गव्हर्मेंट चक्क शटडाऊन झालं होतं, सगळे सरकारी बीचेस जनतेसाठी बंद होते आणि राज्याचे  गव्हर्नर राजमान्य राजश्री क्रिस क्रिस्ती  मात्र त्यातल्या एका बीचवर सहपरिवार विश्रांती घेत असल्याचे फोटो व्हायरल होत होते. वास्तविक 'वेलकम टू न्यू जर्सी' च्या पाटीखाली आमच्या स्वागतार्थ पिझ्झा घेऊन उभं राहायला त्यांना काहीच हरकत नव्हती. त्यांच्या या हरकतीमुळं (म्हणजे आमचं स्वागत न केल्यामुळं नव्हे, तर जनतेसाठी बंद असलेल्या बीचवर स्वतः जाऊन आराम केल्यामुळं) त्यांचं अप्रूव्हल रेटिंग खाली येईल असा काही लोकांचा अंदाज आहे म्हणे. आता त्यांचं अप्रूव्हल रेटिंग सध्या जेमतेम १५% आहे, ते अजून किती खाली येणार? इंजिनियरिंगला माझ्या एका मित्राला एका विषयात सतरा मार्क्स होते. त्यानं मार्क्स वाढतील या आशेनं पेपर रिचेकिंगला दिला होता, तर तो सतराचे चौदा मार्क्स होऊन परत आला होता. तसाच काहीसा हा प्रकार होईल.

*************************************************

मूव्हिंग झालं. संध्याकाळी आवश्यक गोष्टी आणायला बाहेर पडलो होतो.  एका इंटरसेक्शनवर दुसऱ्या ड्रायव्हरनं त्याची जायची टर्न असूनही खिडकीतून हात बाहेर काढून मला आधी जाऊ दिलं. याआधी न्यू जर्सीतल्या 'रूड' ड्रायव्हर्सचे बरेच अनुभव आले होते. त्यामुळं वास्तव्याच्या पहिल्याच दिवशी तिथल्याच एका ड्रायव्हरनं दाखवलेलं

हे सौजन्य बघून आश्चर्याचा धक्का बसला, डोळे भरून आले आणि कंठ दाटून आला. लहानपणी एका ज्योतिषानं 'सदतिसाव्या वर्षी तुझ्या आयुष्यात एक चमत्कार घडेल' असं भाकीत केलं होतं, ते आठवलं. सदतिसावं वर्ष संपायला काहीच दिवस उरलेत, पण अजून कुठल्या चमत्काराचा पत्ता नाही, त्यामुळं हाच तो चमत्कार असणार! कोल्हापुरातल्या होरारत्न जांभेकर गुरुजींनी  इतक्या वर्षांपूर्वी एवढं अचूक भाकीत कसं काय वर्तवलं असेल अशा आश्चर्यमिश्रित आदरानं त्यांना मनोमन नमस्कार केला. पण तितक्यात मी पुढं न गेल्यानं मागून जोरात हॉर्न ऐकू आला आणि मागची गाडी मला ओव्हरटेक करून जोरात पुढं गेली. जाताना त्या गाडीच्या ड्रायव्हरनं माझ्याकडं बघून हाताच्या मधल्या बोटानं तो विशिष्ट निर्देश केला आणि काही शेलके जिव्हाळ्याचे शब्द वापरून तो पुढं गेला. मी गाडी चालवू लागलो आणि स्वतःलाच म्हणालो," वेलकम टू न्यू जर्सी!"

*******************************************************